**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ११**

विषय क्रमांक- १८९ गुरूवार दि.२७/०१/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन करिता (घनकचरा व्यवस्थापन करिता Goverment e Marketplace (GeM) पोर्टल वरून Truck Mounted Jetting- ०२ खरेदी कमी Bid Number: GEM/२०२१/B/१६२४३७० प्राप्त निविदेतील प्राप्त दरास प्रशासनाने केलेल्या मंजुर दरास व येणारे खर्चास मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**संदर्भ:-** १)मा.आयुक्त यांच्या दिनांक २८/१२/२०२१ रोजी मान्यतेनुसार नुसार.
२)दि.२७/१२/२०२१ रोजीच्या मा.छाणनी समिती यांची शिफारसनुसार.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका घपकचरा व्यवस्थापन विभाग

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये प्रस्ताव देण्यात येतो की, घनकचरा व्यवस्थापन करिता **पोर्टल** वरुन Truck Mounted Jetting -०२ खरेदी कामी**Bid Number: GEM/२०२१/B/१६२४३७०**ऑन लाईन दि.२६/१०/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.सदर निविदेत एकुण तीन निविदाकार यांनी भाग घेतलेले आहे.

त्यानुसार सदरील प्राप्त निविदेतील तांत्रिक लिफाफा निविदा उघडण्यात आले आहे.त्यानुसार मा.तांत्रिक समिती समोर कागदपत्रांची छाणनी कामी ठेवण्यात येवुन दि. २७/१२/२०२१ रोजी मा.तांत्रिक छाणनी समितीने आर्थिक दराचा लिफाफा उघडण्याकामी शिफारस नुसार दि. २९/१२/२०२१ रोजी प्राप्त तीन्ही ही निविदाकारांचे आर्थिक दराचा लिफाफा उघडण्यात येवुन खालील प्रमाणे तुलनात्मक दृष्ट्य दर प्राप्त झालेले आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेत निविदाकाराने भरलेले दर | लघुत्तम तपशील |
|---|---|---|---|
| १ | Ensol Multiclean Equipment (p) Ltd. | **Truck Mounted Jetting** -०२ नग करीता रक्कम रु.४४,८०,०००/- | **L-१** |
| २ | Ozone Envirotech | **Truck Mounted Jetting** -०२ नग करीता रक्कम रु.४५,३१,८००/- | **L-२** |
| ३ | U.S.Enterprises,. | **Truck Mounted Jetting** -०२ नग करीता रक्कम रु.५१,७०,०००/- | **L-३** |

वरील प्रमाणे अहमदनगर महानगरपालिके करीता दोन नग Truck Mounted Jetting Machine खरेदी करणेकामी तुलनात्मक दृष्टया Ensol Multiclean Equipment (p) Ltd,Jaypur या निविदाकाराचे दर कमी असलेबाबत दिसुन येत आहे. त्यानुसार अहमदनगर महानगरपालिके करीता दोन नग Truck Mounted Jetting Machine खरेदी करणेकामी प्राप्त ई-निविदा दरानुसार दर रक्कम रु.४४,८०,०००/- नुसार दोन नग इतका खर्च अपेक्षित आहे.

सबब वरील प्रमाणे दरास मंजुरीस्तव व मा.स्थायी समितीची मान्यता घेणेकामी सादर करणेकामी मान्यतेस्तव सविनय सादर

येणे प्रमाणे मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचा अहवाल असे.

यावर घनकचरा विभाग प्रमुख यांची स्वाक्षरी.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर अंतर्गत लेखापरीक्षक यांचा अभिप्राय की,मा.तांत्रीक छाननी समितीच्या शिफारशी नुसार व मुख्य स्वच्छतानिरीक्षक व घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचे प्रस्तावानुसार "अ" प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,"अ" प्रमाणे मान्यतेसाठी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन करिता (घनकचरा व्यवस्थापन करिता Goverment e Marketplace (GeM) पोर्टल वरून Truck Mounted Jetting- ०२ खरेदी कमी Bid Number: GEM/२०२१/B/१६२४३७० प्राप्त निविदेतील प्राप्त दरास प्रशासनाने केलेल्या मंजुर दरास व येणारे खर्चास मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- सध्या आपल्याकडे किती प्रकारचे वाहने आहेत.

घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ.शेडाळे :- एक जेंटींग मशीन आहे.व दोन नवीन जेंटींग मशीनचा प्रस्ताव ठेवला आहे.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन करिता (घनकचरा व्यवस्थापन करिता Goverment e Marketplace (GeM) पोर्टल वरून Truck Mounted Jetting- ०२ नग खरेदी कमी Bid Number: GEM/२०२१/B/१६२४३७० प्राप्त निविदेतील सर्वात दराचे निविदाकार Ensol Multiclean Equipment (p) Ltd,Jaypur यांचे दरास व येणारे खर्चास मंजुरी मान्यता देण्यात येत आहे.

**ठरावः-** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन करिता (घनकचरा व्यवस्थापन करिता Goverment e Marketplace ) (GeM) पोर्टल वरून Truck Mounted Jetting- ०२ खरेदी कमी Bid Number: GEM/२०२१/B/१६२४३७० प्राप्त निविदेतील सर्वात कमी दराचे निविदाकार Ensol Multiclean Equipment (p) Ltd,Jaypur यांचे प्रशासनाने मंजुर केलेल्या दरास व येणारे खर्चास मंजुरी मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :-मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ११**

विषय क्रमांक- १९० गुरूवार दि.२७/०१/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१६ व ०७ मधील रस्ते नुतनीकणासाठी निधी उपलब्ध होणे व प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

**संदर्भ :-** दिनांक २९/११/२०२१ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय.

विनंतीपुर्वक अहवाल सादर की, महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांच्या झालेल्या दुरावस्थेबाबत वर्तमानपत्रे, सामाजीक माध्यमे, इत्यादी मधुन महानगरपालिकेबाबत होत असलेली चर्चा व टीका , लोकप्रतिनिधी,पदाधिकारी, नगरसेवक यांच्याकडुन सतत होणारी मागणी इत्यादी बाबींचा विचार करून मा.महापौर, मा.आयुक्त, मा.श्री.संभाजी कदम शहराध्यक्ष, शहर शिवसेना,मा.सभापती महिला व बालकल्याण समिती सौ.पुष्पाताई बोरूडे , मा.नगरसेवक श्री.गणेश कवडे यांचे समवेत बैठक होवुन शहरातील काही प्रमुख रस्ते नुतनीकरण करणेबाबत चर्चा करण्यात आली.

सदर चर्चेमध्ये इकडुन असे नमुद करण्यात आले की, शहरामध्ये अमृत भुयारी गटर योजना, फेज टू पाणी पुरवठा योजना , महाराष्ट्राज्य विद्युत वितरण कंपनीकडुन काही भागात भुमीगत केबल टाकणे, इतर कंपन्यांच्या केबल , तसेच शहरातील पाणी पुरवठा , गटर, ड्रेनेज व इतर कारणांमुळे रस्ते खोदले गेलेले आहेत तसेच मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे. तसेच प्रमुख रस्त्यांसाठी गेल्या अनेक वर्षापासुन निधि उपलब्ध न होणे हे एक प्रमुख कारण आहे.

या सर्व परिस्थितीचा विचार करुन शहरातील काही प्रमुख रस्ते की ज्या रस्त्यावर वाहतुक मोठ्या प्रमाणावर असुन सदर रस्त्यांचा नागरीकांसाठी ,दळणवळणासाठी उपयोग होत आहे असे रस्ते तातडीने नुतनीकरण करण्याचे मा.महापौर व मा.श्री.संभाजी कदम शहराध्यक्ष, शहर शिवसेना यांनी खालील रस्ते घेण्याचे सुचविलेले आहे.

| अ नं. | रस्त्याचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१६ मधील भैरवनाथ पतसंस्था ते पाच गोडावून ते शाहुनगर बसस्टॉपपर्यंत रस्ता करणे | रू.३.२४ कोटी |
| २ | अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१६ मधील झेंडा चौक ते वैष्णवनगर पर्यंत रस्ता करणे | रू.२.२५ कोटी |
| ३ | अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०७ मधील बोल्हेगाव भागातील गणेश चौक ते राघवेंद्र स्वामी मंदिर ते केशव कॉर्नर पर्यंत रस्ता करणे | रू.४.४५ कोटी |
| ४ | अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०७ मधील बोल्हेगाव भागातील सनफार्मा शाळा ते आंबेडकर चौक ते गणेश चौक ते सिना नदीपर्यंत गटर करणे | रू.०.९५ कोटी |
| | **एकुण** | रू.१०.८९ कोटी |

वरीलप्रमाणे रू.१०.८९ कोटी रूपये इतकी तरतुदीची आवश्यकता आहे. वरील रस्त्यांचा विचार करता वाहतुकीच्या , दळणवळाणाच्या व नागरीकांचा विचार करुन तसेच रस्त्यांची सद्यस्थिती पहाता हे रस्ते नुतनीकरण करणे आवश्यक आहे. सन २०२१-२०२२ चे मा.महासभेने मंजुर केलेले अंदाजपत्रक व त्यातील लेखाशिर्षनिहाय तरतुदींचा विचार करता वरीलप्रमाणे रक्कम उपलब्ध होणे आवश्यक आहे. सन २०२१-२०२२ चे अंदाजपत्रकामध्ये " नविन रस्ते विकसित करणे " या लेखाशिर्षका अंतर्गत रक्कम रुपये २.०५ कोटी एवढी तरतुद ठेवलेली आहे. वरील प्रमाणे रस्त्यांची कामे तातडीने हाती घ्यावयाची झाल्यास या तरतुदीमध्ये वरील प्रमाणे रक्कम समाविष्ठ करुन मोठी वाढ करावी लागेल.

यापुर्वी या विभागाने दि.२७/०९/२०२१ रोजी शहरातील वाहतुकीच्या दृष्टीने महत्वाचे व जास्त प्रमाणात खराब झालेल्या रस्त्यांचे अंदाजपत्रक तयार करून रक्कम रू.१०.६३ कोटी एवढया रकमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. परंतू वर नमुदप्रमाणे सन २०२१-२२ चे मंजुर अंदाजपत्रकामध्ये "नविन रस्ते विकसित करणे" या लेखाशिर्षकाअंतर्गत ठेवलेली मुळ तरतुद रक्कम रू.२.०५ कोटी यामध्ये आणखी रक्कम रू.१०.६३ कोटी एवढी वाढ करण्यासही मुख्यलेखाधिकारी व मा.आयुक्त यांचे समवेत सविस्तर चर्चा करून इतर लेखाशिर्षकावरील तरतुद कमी करण्याचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर सादर केला असता मा.स्थायी समिती सभा क्र.०८ विषय क्र.१७ दि.२५/१०/२०२१ अन्वये मान्यता मिळालेली असून सदर तरतुदी कायम करण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.महासभेसमोर सादर करण्यासाठी नगरसचिव कार्यालयाकडे पाठविण्यात आलेला आहे.

आता सद्यस्थितीत वरील सुचविलेल्या कामांसाठी "नविन रस्ते विकसित करणे" या लेखाशिर्षकामधील तरतुद रक्कम रू.२.०५ कोटी + यापुर्वी सुचविलेल्याप्रमाणे चार कामांसाठी रक्कम रू.१०.६३ कोटी + सदर नविन प्रस्तावित केलेल्या कामांची रक्कम रू.१०.८९ कोटी अशी एकूण २३.५७ कोटी एवढी सुधारीत तरतुद "नविन रस्ते विकसित करणे" या लेखाशिर्षकामध्ये वाढीसह एकूण तरतुद करणे आवश्यक आहे.

तरी " नविन रस्ते विकसित करणे " या लेखाशिर्षका अंतर्गत वरीलप्रमाणे एकूण २३.५७ कोटी एवढया रकमेची वाढीव तरतुद करणेस मुख्यलेखाधिकारी यांना आदेश होवून त्या लेखाशिर्षक वाढीव तरतुदीच्या बदलाचा आदेशानंतर वरील प्रमाणे रस्त्याचे व गटरचे अंदाजपत्रके तयार करुन प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता व इतर प्रक्रिया राबविणेस रिपोर्ट मान्यतेस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, बांधकाम विभागाने कोणत्या लेखाशिर्षातून तरतुद कमी करावी या बाबत कळविल्यास प्रसतावित तरतुद वाढवीणेत येईल.

यावर उप अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर

प्रस्तावित कामांसाठी खालील नमूद लेखशिर्षकातून "नविन रस्ते विकसित करणे " अंतर्गत सुधारीत तरूतुद घेणे योग्य आहे.

| अ. क्र. | शहर उपनगर हद्दवाढीतील परिसर (नागरी सुविधा पुरविणे) | तरतुद (लक्ष मध्ये ) | सुधारीत तरतुद | कमी |
|---|---|---|---|---|
| १ | शहर उपनगर हद्दवाढीतील परिसर (नागरी सुविधा पुरविणे) | १००.०० | १.०० | ९९.०० |
| २ | विकास भार निधीतून | ४५५.०० | २७०.०० | १८५.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | अतिरीक्त चटई क्षेत्र प्रिमीयम रक्कम | ७००.०० | ५७३.०० | १२७.०० |
| ४ | मुलभूत सुविधा विकास योजना (मनपा हिस्सा) | १००.०० | १.०० | ९९.०० |
| ५ | नाटयसंकुलासाठी मनपा सहाय्य जकात ठेकानुसार | ३०.०० | १.०० | २९.०० |
| ६ | महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (मनपा हिस्सा) | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| ७ | सावेडी गावठाण येथे शॉपींग कॉम्प्लेक्स बांधणे | ५००.०० | १००.०० | ४००.०० |
| | | | एकूण रक्कम रू | **१०८९.००** |

वर नमुद अ.क्र.१व ४ ते७ मधील लेखाशिर्ष खर्च निरंक आहे.

तरी उक्त प्रमाणे कार्यवाही करणेस व सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा.स्थायी समितीकडे निर्णयास्तव पाठविणेस रिपोर्ट अवलोकनार्थ तथा आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्रायकी,वरील प्रमाणे सन २०२१-२०२२ चे अंदाजपत्रकातील तरतूदी मध्ये फेरबदल (Re - Apropreapion) करणेस मा.स्थायी समितीकडे सादर करणे योग्य.आदेशार्थ सादर.

यावर मा.अंतर्गत लेखापरिक्षक यांचा अभिप्रायक की,१.विकास भार तरतुद रू.४,५५,००,०००/- पैकी "नविन रस्ते विकसीत करणे " या लेखाशिर्षातर्गत रू.१,८५,००,०००/- वर्ग करणे बाबत प्रस्तावात नमुद केलेले दिसून येते.त्यामुळे विकासभार या लेखाशिर्ष मध्ये १,८१,९०३/- इतकी रक्कम शिल्ल्क दिसून येते.विकासभार या लेखाशिर्षातुन सद्य स्थितीत प्रस्तावित केलेल्या कामाचा अहवाल दिसून येत नाही.त्यामुळे शिल्ल्क तरतुदीबाबत खात्री करावी.

२.अतिरीक्त चटई क्षेत्र तरतुद रू.७,००,००,०००/- पैकी नविन रस्ते विकसीत करणे या लेखाशिर्षातर्गत १,२७,००,०००/- वर्ग करणे बाबत प्रस्तावात नमुद केलेले दिसुन येते त्यामुळे अतिरीक्त चटई क्षेत्र या लेखाशिर्ष मध्ये ७२,८४,०५७/- इतकी रक्कम शिल्लक दिसुन येते अतिरीक्त चटई क्षेत्र या लेखाशिर्षातुन सद्यस्थितीत प्रस्तावित केलेल्या कामाचा अहवाल दिसुन येत नाही. याबाबत खात्री करावी.

३.महाराष्ट्र महानगरपालिका लेखासंहिता अधिनियम २०११ मधील प्रकरणक -३० नियम ४२२,४२४,व ४२६ च्या तरतुदीनुसार सुधारीत अर्थसंकल्प मा.स्थायी समिती व मा.महासभा यांची मंजूरी घेवून कार्यवाही करावी.

यावर मा.शाखा अभियंता यांचा अभिप्राय की,उक्त अ.क्र.१ व २ बाबतच्या नोंदी बजेट रजिष्टर मध्ये घेण्यात आलेले आहेत.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,बांधकाम विभागाने प्रस्तावित केलेल्या लेखाशिर्षनिहाय तरतुदी ,मुलेअ यांचे अभिप्राय व अं.ले.प.यांचे अहवालानुसार पुढील कार्यवाहीस्तव आदेशार्थ सादर.

यावर आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मुलेप/मुलेअ/नगर अभियंता / उपायुक्त संयुक्त बैठक लावा.

यावर मा.आयुक्त यांचा अभिप्राय की,चर्चा करा., प्रस्तावित अनुक्रमांक २ व ३ ची प्रत्यक्ष किती रक्कम उपलब्ध होईल त्याचा ताळमेळ घेवून एकत्र शिल्लक तरतुद पाहून अहवाल सादर करावा.

यावर उप अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर, अ.क्र.२ विकासभार करीता रू.४५५ लक्ष तरतुद पैकी विकास कामांकरीता खतावणी २६५ लक्ष इतकी केली असल्याने देयकासाठी २६५ लक्ष आवश्यक आहे व उर्वरीत ४५५-२६५ = १९० लक्ष पैकी १८५ लक्ष रूपये सुधारीत तरतुदीकरीता वापर केली आहे.

अ.क्र.नं.करीता सन २०२०-२१ करीता ८०० लक्ष तरतुद पैकी १०० लक्ष या आगोदर पाच रस्त्यांच्या कामा करीता "नविन रस्ते " या लेखाशिर्षात वर्ग कली आहे.त्यामुळे ८००-१००=७०० लक्ष पैकी रू.५०१ लक्ष विकास कामा करीता खतावाणी केली असल्याने सदर रक्कम देयका करीता आवश्यक आहे.

यास्तव ७००-५०१=१९९ लक्ष पैकी १२७ लक्ष सुधारीत तरतुदी करीता वापर केला आहे.तथापी वरील अहवाल तरतुदीशी संलग्न रकमेप्रमाणे आहे व प्रत्यक्ष तरतुदीसाठी मा.मुलेअ यांचा अभिप्राय घेवून रिपोर्ट आदेशार्थ सादर.

यावर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्यानुसार पुढील कार्यवाहीस्तव आदेशार्थ सादर

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,मा.महापौर यांचे पत्र दि.१०/०१/२०२२ बार्बीचा विचार करून उचित कार्यवाही करावी.

यावर शाखा अभियंता व उप अभियंता यांचा अभिप्राय की,मा.फेरसादर,उक्त

उक्त संदर्भिय पत्रानुसार खालील नमुद कामे सन २०२२-२३ चे अर्थसंकल्पात "नविन रस्ते विकसित करणे" या लेखाशिर्षकातून नावासह प्रस्तावित करावीत व अ.क्र.१ ते ४ कामांसाठीची रक्कम विकासभार व अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमियम रकमेतून विकास कामे करणे या लेखाशिर्षकातून प्रस्तावित करण्यात येवू नये असे सुचित केले आहे.

अ) वगळलेले / स्थगित कामे

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१६ मधील झेंडा चौक ते वैष्णवनगर पर्यंत रस्ता करणे | रू.२२५.०० लाख |
| २ | प्रभाग क्र.७ मधील बोल्हेगाव भागातील सनफार्मा शाळा ते आंबेडकर चौक ते गणेश चौक ते सिना नदीपर्यंत गटर करणे | रू.९५.०० लाख |
| | एकूण रक्कम रू. | रू.३२०.०० लाख |

उक्त दोन कामे वगळता उर्वरीत दोन कामांसाठी रक्कम रू.७६९.०० लक्ष खर्च विकासभार व अतिरीक्त चटई क्षेत्र निर्देशांकापोटी प्रिमियम रक्कम या लेखाशिर्षकातून न करता टी-३ वर नमुद उर्वरीत लेखाशिर्षकातून प्रस्तावित केल्यानुसार करणे योग्य. त्याचा तक्ता खालीलप्रमाणे

| अ.क्र | लेखाशिर्षक | तरतुद (लक्ष मध्ये) | सुधारीत तरतुद | कमी |
|---|---|---|---|---|
| १ | शहर उपनगर हद्दवाढीतील परिसर (नागरी सुविधा पुरविणे) | १००.०० | १.०० | ९९.०० |
| २ | मुलभूत सुविधा विकास योजना (मनपा हिस्सा) | १००.०० | १.०० | ९९.०० |
| ३ | नाटयसंकुलासाठी मनपा सहाय्य जकात ठेकानुसार | ३०.०० | १.०० | २९.०० |
| ४ | महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (मनपा हिस्सा) | २००.०० | ५०.०० | १५०.०० |
| ५ | सावेडी गावठाण येथे शॉपींग कॉम्प्लेक्स बांधणे | ५००.०० | १००.०० | ४००.०० |
| | | | एकूण रक्कम रू | **७७७.००** |

ब) प्रस्तावित कामे

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| १ | अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१६ मधील भैरवनाथ पतसंस्था ते पाच गोडावून ते शाहुनगर बसस्टॉपपर्यंत रस्ता करणे | रू.३.२४ कोटी |
| २ | अहमदनगर मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०७ मधील बोल्हेगाव भागातील गणेश चौक ते राघवेंद्र स्वामी मंदीर ते केशव कॉर्नर पर्यंत रस्ता करणे | रू.४.४५ कोटी |
| | एकूण रक्कम रू. | रू.७.६९ कोटी |

उक्त दोन कामे वगळता उर्वरीत दोन कामांसाठी लागणारा निधी इतर लेखाशिर्षकामधून कमी करून "नविन रस्ते विकसित करणे" या लेखाशिर्षकाचे पुनर्विलोकन करून या विभागाकडून करण्यात येणार असल्याने सदर कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेस व त्यानुसार ई निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेस्तव ऑफीस रिपोर्ट मान्यतेस फेरसादर.

यावर शहर अभियंता यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,बांधकाम विभागाने नविन रस्ते विकसीत करणे या लेखाशिर्षा चे पुर्नविलोकन करणेच्या अटीस अधिन राहून व मा.मुलेअ यांच्या अभिप्रायानुसार विभागाने कार्यवाही करावी.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,T-४ व T-५ वरील यापूर्वीचे अभिप्राय व तदृनंतर शाखा अभियंता व शहर अभियंता यांनी लेखाशिर्षनिहाय केलेले पुर्नविनीयोजन त्यावर .मुलेअ व अंलेप यांचे अभिप्रायानुसार पुढील कार्यवाहीस्तव आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,पुर्नविलोकान करणेसाठी मा.स्थायी समितीकडे सादर.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>ऑनलाईन चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१६ व ०७ मधील रस्ते नुतनीकणासाठी निधी उपलब्ध होणे व प्रशासकिय मान्यता मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.या बाबत सविस्तर माहिती सांगा.

शहर अभियंता श्री.इथापे :- महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांच्या झालेल्या दुरावस्थेबाबत वर्तमानपत्रे, महानगरपालिकेबाबत चर्चा व टीका , लोकप्रतिनिधी,पदाधिकारी, नगरसेवक यांच्याकडुन सतत होणारी मागणी इत्यादी बाबींचा विचार करून मा.महापौर, मा.आयुक्त, ,मा.सभापती महिला व बालकल्याण समिती , मा.नगरसेवक यांचेमध्ये बैठक होवुन शहरातील काही प्रमुख रस्ते नुतनीकरण करणेबाबत चर्चा करण्यात आली.सदर चर्चेमध्ये इकडुन असे नमुद करण्यात आले की, रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे. प्रमुख रस्त्यांसाठी गेल्या अनेक वर्षापासुन निधि उपलब्ध न होणे प्रमुख कारण आहे.

सदर बैठकी नुसार चार कामे सुचविण्यात आली होती त्यामधील केडगांव उपनगरामध्ये रस्ता व गटर करणे दोन कामे तसेच बोल्हेगांव परिसरामध्ये रस्ता व गटर करणे अशी दोन कामे परंतु निधी अभावी ही चार कामे करणे शक्य नसल्याने उक्त दोन कामे वगळता उर्वरीत दोन कामांसाठी लागणारा निधी इतर लेखाशिर्षकामधून कमी करून "नविन रस्ते विकसित करणे" या लेखाशिर्षकाचे

पुनर्विलोकन करून या विभागाकडून करण्यात येणार असल्याने सदर कामांना प्रशासकीय मान्यता मिळणेस व त्यानुसार ई निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेस्तव ऑफीस रिपोर्ट मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.

मा.श्री.समद खान:- लेखाशिर्षकाचे पुर्नविलोकन करून सदरच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१६ मधील भैरवनाथ पतसंस्था ते पाच गोडावून ते शाहुनगर बसस्टॉपपर्यंत रस्ता करणे रू.३.२४ कोटी व प्रभाग क्र.०७ मधील बोल्हेगाव भागातील गणेश चौक ते राघवेंद्र स्वामी मंदीर ते केशव कॉर्नर पर्यंत रस्ता करणे. रू.४.४५ कोटी असे एकूण रक्कम रू रू.७.६९ कोटी. या कामांकरीता दोन कामांसाठी लागणारा निधी इतर लेखाशिर्षकामधून कमी करून "नविन रस्ते विकसित करणे" या लेखाशिर्षकाचे पुनर्विलोकन संबंधित विभागाकडून करण्यास तसेच सदर कामांना प्रशासकीय व त्यानुसार ई निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१६ मधील भैरवनाथ पतसंस्था ते पाच गोडावून ते शाहुनगर बसस्टॉपपर्यंत रस्ता करणे रू.३.२४ कोटी व प्रभाग क्र.०७ मधील बोल्हेगाव भागातील गणेश चौक ते राघवेंद्र स्वामी मंदीर ते केशव कॉर्नर पर्यंत रस्ता करणे. रू.४.४५ कोटी असे एकूण रक्कम रू रू.७.६९ कोटी. या कामांकरीता दोन कामांसाठी लागणारा निधी इतर लेखाशिर्षकामधून कमी करून "नविन रस्ते विकसित करणे" या लेखाशिर्षकाचे पुनर्विलोकन संबंधित विभागाकडून करण्यास तसेच सदर कामांना प्रशासकीय व त्यानुसार ई निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ११**

विषय क्रमांक- १९१ गुरूवार दि.२७/०१/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ या आर्थिक वर्षा मध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना स्वर्यपुर्ण होण्याच्या दृष्टीने घरगुती वापर पाणीपट्टीचे दरात वाढ करणेस बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या शिफारशी नुसार मा.महासभे समोर सादर करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

विषयांकीत बाबत विनंती रिपोर्ट सादर की,अहमदनगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता चालू वर्षी पाणीपट्टीसह इतर करांचे अपेक्षित वसुली होत नसल्याने महानगरपालिकेची शाश्वत उत्पन्न कमी होत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येत आहे. परिणामी शहर पाणी योजनेपोटी वीज वितरण कंपनीचे दर महिन्याची वीज बीले वेळेत अदा होत नसल्याने शहर पाणी पुरवठा योजनेची वीज बीले वेळेत भरणेस वांरवार अडचणी निर्माण होत आहे. वीज बीले वेळेत न भरली गेल्यास भविष्यात वीज कपातीचे संकट कायम आहे. अशा परिस्थितीत घरगुती वापर पाणीपट्टीचे दरात वाढ करणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे.

त्यासाठी अहमदनगर महानगरपालिकेकडे घरगुती पाणी वापर ग्राहकांची असलेली संख्या त्यामधून सदयस्थितीत मिळणारे उत्पन्न व प्रस्तावीत दर वाढ केल्यास त्यामधून मिळणारे उत्पन्न इत्यादी बाबीचे अवलोकन केले असता उत्पन्नामध्ये मोठया प्रमाणात फरक पडणार आहे. तसे केले तरच पाणी पुरवठा योजना चालविणेसाठी लागणारा खर्च व त्यामधून मिळणारे उत्पन्न इत्यादींचा भविष्यात ताळमेळ बसविणे सुलभ होणार आहे.

सन २०१६-२०१७ पासून मा. महासभेच्या मंजूरीने घरगुती वापर पाणीपट्टी दरवाढ वगळता व्यावसायीक वापर, औदयोगिक वापर, इत्यादींचे पाणी दरामध्ये एप्रिल २०१६ पासून दरवाढ लागू करण्यात आलेली आहे. परंतू अहमदनगर महानगरपालिकेकडे घरगुती वापर पाणी ग्राहकांची संख्याच मोठया प्रमाणावर असल्याने घरगुती पाणी ग्राहक वगळून इतर पाणी ग्राहकांचे पाणी पट्टीमध्ये दर वाढ केल्याने महानगरपालिकेच्या उत्पन्नामधून जास्त फरक पडत नाही.

त्यासाठी मागील वर्षी मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांनी एकूण खर्च [महानगरपालिकेचा] व एकूण उत्पन्न वजा जाता होणारा तोटा सन २०१८-१९ मध्ये १५१२.५७ लक्ष तोटा होत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिको अधिनियम १९४९ मधील कलम ९९ नुसार, कलम १२९ अ तरतुदी नुसार सन २०२०-२०२१ पासून घरगुती पाणी ग्राहकाचे पाणी पट्टी मध्ये प्रस्तावित केले नुसार

१. १/२ इंची नळ कनेक्शन रू. १५००/- मध्ये वाढ करून रू. ३०००/-
२. ३/४ इंची नळ कनेक्शन रू. ३०००/- मध्ये वाढ करून रू. ६०००/-
३. १ इंची नळ कनेक्शन रू. ६०००/- मध्ये वाढ करून रू. १००००/-

हद्दी बाहेरील घरगुती वापर १/२ इंची नळ कनेक्शन रू. ३०००/- मध्ये वाढ करून रू.६०००/- तसेच शहरातील मीटरद्वारे घरगुती वापर प्रति हजार लिटर रू. ५/- मध्ये वाढ करून रू. १०/- व मुख्य जलवाहिनीवरील मीटरद्वारे घरगुती वापर प्रति हजार लिटर रू. १०/- मध्ये वाढ करून रू. २०/- प्रति हजार लिटर याप्रमाणे दर वाढ करणे बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या शिफारशी नुसार मा.महासभे समोर सादर करणेस मंजूरी दिलेली होती.

तद्नुसार विषयांकीत बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मान्यते साठी सादर करण्यात आला असता मा. स्थायी समिती सभा क्र.०९, विषय क्र. १४९, दि.०६/०२/२०२० अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत झालेला आहे.

**ठराव :** " अहमदनगर महानगरपालिका नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या पाणी पुरवठा योजना स्वंयपूर्ण होणेच्या दृष्टीने घरगुती वापर पाणी पट्टीचे दरात वाढ करणे बाबतचा ऑफिस रिपोर्टवर सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार घरगुती पाणी पट्टी मध्ये सध्या असलेल्या दरामध्ये १० % वाढ करण्यात येत आहे. ज्यावेळी फेज - २ चे काम पूर्ण झालेनंतर संपूर्ण शहरामध्ये योग्य दाबाने मुबलक पाणी पुरवठा होईल. त्यानंतर पाणीपट्टी मध्ये प्रस्तावित केलेली पाणी पट्टी वाढ करण्यात येईल. "

मा.स्थायी समितीने मंजूर केलेला घरगुती वापर पाणीपट्टी वाढीचा ठराव महानगरपालिकेच्या सन २०२०-२०२१ च्या अर्थसंकल्पीय मा. महासभेसमोर चर्चेसाठी पाठविण्यात आलेला होता. परंतू सदर बाबत महासभेत निर्णय झालेला नाही.

**तद्नंतर सन २०२१ -२०२२ पासून घरगुती पाणी वापर ग्राहकांचे पाणीपट्टीमध्ये दरवाढ लागू करणे करीता विषयांकीत बाबतचा प्रस्ताव मा. आयुक्त यांचे मंजूरीने इकडीज जा.क्र. शहर पा.पु. ८४७ दि. १८/०२/२०२१ अन्वये मा. नगरसचिव कार्यालयाकडे पाठविण्यात आलेला होता. परंतू सदर बाबत महासभेत निर्णय झालेला नाही.**

**मागील ५ वर्षात पाणीपट्टी पासून मिळणारे उत्पन्न व खर्चाची आकडेवारी खालील प्रमाणे**

| **वर्ष** | **उत्पन्न** | **खर्च** | **तोटा** |
|---|---|---|---|
| २०१६-१७ | १०४५.३९ | २०४१.०३ | **९९५.६४** |
| २०१७-१८ | १०५९.९० | २८२९.८७ | **१७६९.९७** |
| २०१८-२०१९ | १७०४.७६ | ३२१७.३३ | **१५१२.५७** |
| २०१९-२०२० | १०५९.८२ | ३१७१.३२ | **२१११.५०** |
| २०२०-२०२१ | ११८४.१४ | ३५०४.५७ | **२३२०.४३** |

तसेच पाणी पुरवठा विभागाकडील उपलब्ध अभिलेखा नुसार पाणी पुरवठा योजना स्वंयपूर्ण होणेच्या दृष्टीकोनातून सन २०१०- २०११ पासून पाणी पट्टी दर वाढी बाबत वेळोवेळी प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्यात आलेले आहेत. परंतू **सन २०१६-२०१७ मध्ये वाणिज्य व औद्योगिक पाणी वापर ग्राहकांची केलेली दरवाढ वगळता महानगरपालिका स्थापन झाले पासून मागील १७ वर्षात घरगुती पाणी वापर दरात एकदाही दरवाढ झालेली नाही.**

परंतू दरम्यान कालावधीत वीज वितरण कंपनीकडून वेळोवेळी केलेली दरवाढ, अशुध्द पाणी आकार दरवाढ, पाणी पुरवठा योजना व वितरण व्यवस्था दैंनदिन देखभाल दुरूस्ती खर्चात होत असलेली वाढ, आस्थापना खर्चात झालेली वाढ इत्यादी कारणामुळे खर्च दिवसेंदिवस वाढत असून त्यामुळे होणारा तोटा (**रूपये २३२०.४३ लक्ष इतका तोटा**) हा लक्षणीय आहे.

यास्तव वरील सर्व परिस्थिती विचारात घेता सन २०२२-२०२३ पासून घरगुती पाणी वापर ग्राहकांचे पाणीपट्टीमध्ये दरवाढ लागू करणे करीता विषयांकीत बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या शिफारशीने मा.महासभे समोर चर्चेसाठी ठेवून तेथील निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे संयुक्तीक राहील.तथापी आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,उपरोक्त अहवालामध्ये नमुद "अ" नुसार दरामध्ये वाढ करणे संयुक्तीक वाटते तरी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,As Proposed

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**ऑनलाईन चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ या आर्थिक वर्षा मध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना स्वर्यपुर्ण होण्याच्या दृष्टीने घरगुती वापर पाणीपट्टीचे दरात वाढ करणेस बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या शिफारशी नुसार मा.महासभे समोर सादर करणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.श्री.शाम नळकांडे :- महानगरपालिका रोज पाणी देण्या करीता सक्षम आहे का? कल्याण रोड येथे ४ ते ५ दिवसांनी पाणी पुरवठा करण्यात येतो.तो सुध्दा कमी दाबाने असतो.तुम्ही योग्य दाबाने पाणी पुरवठा करा.त्यानंतर पाणी पट्टी मध्ये वाढ करा.अमृत योजने चे काम गेल्या १५ वर्षापासुन चालू आहे.केव्हा पुर्ण होणार याची शाश्वती नाही.प्रत्येक मीटींग मध्ये १५ दिवसांनी महिन्यामध्ये काम पुर्ण होईल याचे आश्वासन दिले जाते.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- पाणीपट्टी वाढीला विरोध नाही,परंतु पुरेसा पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे.आधी पाणी दया.त्यानंतर पाणीपट्टी मध्ये वाढ करा.

मा.सभापती साहेब :- अमृत योजनेच्या मिटींग करीता मी उपस्थित होतो.मा.आयुक्त साहेबांनी सांगीतले की,काही छोटया अडचणी आहेत.त्यामी स्वत: पहाणी करून सोडवीण्यात येतील.एम.जी.पी.कडे काही कागदपत्रे देणे आवश्यक आहे.त्यांना आवश्यक असलेली कागदपत्रे तात्काळ देण्यात यावीत.तसेच ६०० HP च्या दोन मोटारी विळदला घ्यायच्या आहेत.योजनेमध्ये या मोटारी धरल्यानसल्याने आपल्याला वेळ लागत आहे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- एम.जी.पी.च्या प्रस्तावात या मोटारीचा समावेश नव्हता.

मा.सभापती साहेब :- हि कोणाची चूक आहे.आपली कि,एम.जी.पी.चूक आहे.

पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.सातपुते :- एम.जी.पी.ची चूक आहे.माझ्याकडे चार्ज आल्यापासून माझ्या लक्षात आल्यानंतर मी या बाबत पाठपुरावा करून त्यांच्या निदर्शनास हि बाब आणून दिली आहे.

मा.श्री.शाम नळकांडे :- कल्याण रोड परीसरामध्ये ७ ते ८ दिवसांनी पाणी येते.तुम्ही या भागामध्ये राहून पहा.पाणी आले नाही तर काय होते.पाणी नसल्यावर काय होते ते आम्हाला माहित आहे.

मेकॅनिकल इंजी.श्री.निकम :- एम.जी.पी.मार्फत मोटारी बसवायच्या आहेत.त्याचा प्रस्तावा आपण पाठविला आहे.त्याची मंजूरी आली की बसविण्यात येतील.

मा.सभापती साहेब :- माझे व सदस्यांचे म्हणणे एवढेच आहे की,या मोटारी जर आधीच प्रस्तावामध्ये असत्यातर आपला वेळ वाया गेला नसता.आत्ता आपण या विषयावर सभेमध्येया विषयावर चर्चा झाली नसती.

मेकॅनिकल इंजी.श्री.निकम :- महाराष्ट्र जीवन प्रधिकरण यांची ही योजना आहे.आपल्याला त्यांनी कुठेच सांगीतले नाही.आणी बोलावले सुध्दा नाही.आपल्याला कोणत्याही बाबींमध्ये त्यांनी हस्तक्षेप करू दिला नाही.त्या विभागाची चूक आहे.

मा.श्री.शाम नळकांडे :- जर एम.जी.पी.ची चूक आहे तर आपण त्यांना जबाबदार धरू शकत नाही का?पाणी पुरवठा सुरळीत होत नाही तो पर्यत पाणपट्टी मध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात येवू नये.माझा या वाढीला विरोध आहे.

डॉ.मा.श्री.सागर बोरूडे :- जो पर्यत पाणी पुरवठा योग्य दाबाने व सुरळीत होत नाही तो पर्यत पाणीपट्टी मध्ये कोणत्याही प्रकारची वाढ करण्यात येवू नये.माझा पाणीपट्टी वाढीला विरोध आहे.

मा.श्री.समद खान :- सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करण्यात यावा.

मा.श्री.शाम नळकांडे :- महासभेपुढे विषय सादर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२०२३ या आर्थीक वर्षा मध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना स्वर्यपुर्ण होण्याच्या दृष्टीने घरगुती वापर पाणीपट्टीचे दरात वाढ करणेस बाबतचा प्रस्ताव मा.महानगरपालिका सभे पुढे सादर करण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसारअहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२०२३ या आर्थीक वर्षा मध्ये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पाणी पुरवठा योजना स्वर्यपुर्ण होण्याच्या दृष्टीने घरगुती वापर पाणीपट्टीचे दरात वाढ करणे बाबतचा प्रस्ताव मा.महानगरपालिका सभे पुढे सादर करण्यात यावा.

सदरचा ठराव विभागाने प्रशासकीय मान्यता घेवून मा.महानगरपालिका सभे पुढे सादर करण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्र.- ११**

विषय क्रमांक- १९२ गुरूवार दि.२७/०१/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून प्रत्येक करयोग्य मुल्याचे २% अग्निशमन कर लागू करणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन विभाग

संदर्भ- १] संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा व अग्निशमन सल्लागार महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.७०४/अस दि.१३ सप्टेंबर २००९

उपरोक्त संदर्भान्कीत विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करणेत येतो की, आज मितीस महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये अग्निशमन दलामार्फत आपत्कालीन प्रसंगी सेवा पुरविली जाते. परंतु इतर महानगरपालिका प्रमाणे कोणत्याही प्रकारचा अग्निशमन कर आकारला जात नाही.

संदर्भिय शासन परिपत्रकान्वये महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ दि.६डिसेंबर २००८ पासून नागरी स्थानिक स्वराज्य संस्था व विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रात लागू केला आहे. या अधिनियमाचे कलम ४ अन्वये महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना नियम २००९ शासनाने दि.२३ जून २००९ रोजी मंजूर करून शासन राजपत्रात प्रसिध्द केले आहेत.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये महाराष्ट्र आग प्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ लागू करण्यात आलेले असून दि.२२ जून २०१० रोजीच्या मनपाच्या सर्वसाधारण सभेच्या प्रस्ताव क्र.९ अन्वये सदर अधिनियम व नियमांची अंमलबजावणी व कार्यवाही होणे करिता सदरच्या प्रस्तावास मान्यता मिळाल्याने अधिनियम व नियमांन्वये कार्यवाही करण्यात येत आहे.

अग्निशमन सेवा बळकटीकरण करण्यासाठी उपरोक्त अधिनियम २००६ चे कलम २५(३) नुसार अत्याधुनिक साधनसामुग्री व उपकरणे खरेदी करणेसाठी व काही प्रमाणात अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व भत्ते यावर होणारा खर्च भागविणेसाठी शासन निर्णयानुसार नगरविकास विभाग क्र.अशस १४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि-२० दि.३१/०८/२००९नुसार अग्निशमन सेवेतील तूट भरून काढणेसाठी अर्थसंकल्पात आवश्यकत ती तरतूदीनुसार "आग सुरक्षा निधी" त्याचबरोबर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९चे (क) च्या ६३ च्यानुसार "अग्निशमन कर" अकारणे बंधनकारक आहे.

उक्त प्रकरणी अग्निशमन कर लावणेबाबतचे प्रस्ताव सन २००९-१० पासून मा.स्थायी समिती व मा. महासभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत.मात्र सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजुरी मिळून कर लागू करणेबाबत शिफारस देवून सदरचा प्रस्ताव कर दर वाढीच्या मा.महासभेपुढे सादर अशा अनुषंगाने प्रस्ताव होवून सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करण्यात येत असून सदर प्रस्तावास अद्यापही मान्यता मिळालेली नाही.

सदरच्या प्रस्तावास मान्यता मिळणे आवश्यक व गरजेचे आहे. २% कर वाढीमुळे अग्निशमन सेवेचे बळकटीकरण, नवीन वाहन खरेदी, उपयुक्त साधन सामुग्री खरेदी इ. बाबतीत खर्च भागवीणे शक्य होणार आहे. आतमीतीस शहराची वाढती लोकसंख्या व क्षेत्रफळ पाहता अग्निशमन सेवा पुरविणे मनपाचे कर्तव्य जरी असले तरी सदर विभागावर होणारा खर्चाचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम १२९मधील(क)अन्वये"त्यांच्या करयोग्य मुल्याच्या बारा टक्यांहून कमी नाही इतका महानगरपालिकेने तसे ठरविल्यास बसवता येईल असा सामान्य कर कलम ६३,खंड (५)आणि प्रकरण १७दवारे किंवा तद्अन्वये महानगरपालिकेवर लादण्यात आलेली किंवा त्यामधून उद्भवणारी

कर्तव्य पार  पाडण्यासाठी आवश्यक असेल अशा खर्चाची तरतूद करण्यासाठी त्यांच्या करयोग्य मुल्याच्या कमीत कमी एक-अष्टमांश टक्क्यांइतके आणि जास्तीत जास्त दोन टक्क्यांएवढे मुल्य सामान्य करात समाविष्ट करण्यात येईल. असे मालमत्ता करामध्ये करांचा समावेश करण्याबाबतीतची तरतूद आहे.

सबब उपरोक्त तरतूदीच्या अनुषंगाने व संदर्भिय शासकीय परिपत्रकान्वये निर्देश देण्यात आलेले असल्याने अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मुल्याचे कमीत कमी एक-अष्टमांश टक्क्यांइतके किंवा जास्तीत जास्त २% अग्निशमन कर सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षापासून लागू करणेस सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमाणे मुख्य अग्निशमन अधिकारी यांचा अहवाल असे

यावर मा.मुख्यलेखाधिकारी यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,१) मा.संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा व अग्निशमन सल्लागार यांचे दि.२३ सप्टेंबर२००९ चे पत्रातील परिच्छेद ०२,०३ नुसार कार्यवाही करणे बंधनकारक आहे.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम १२९(क) प्रमाणे करयोग्य मुल्याचा १/८ अथवा जास्तीत जास्त २% प्रमाणे कर आकारणी बाबतचा प्रस्ताव "अ" नुसार मा.स्थायी समिती पुढे सादर करणेस मान्यतेस्तव सादर.

३)मा.संचालक यांचे २००९ मधील पत्र पहाता अग्निशमन विभागाने अदयाप पर्यत दर वाढी बाबत केलेल्या कार्यवाहीची खात्री करावी.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,  "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>ऑनलाईन चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून प्रत्येक करयोग्य मुल्याचे २% अग्निशमन कर लागू करणेबाबत ऑफिस रिपोर्ट अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ या बाबत माहिती सांगा.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- अग्निशमन सेवा बळकटीकरण करण्यासाठी अत्याधुनिक साधनसामुग्री व उपकरणे खरेदी करणेसाठी ,अग्निशमन सेवेतील तूट भरून काढणेसाठी शासकीय परिपत्रकान्वये निर्देश देण्यात आलेले असल्याने अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये प्रत्येक करयोग्य मुल्याचे कमीत कमी एक-अष्टमांश टक्क्यांइतके किंवा जास्तीत जास्त २% अग्निशमन कर सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षापासून लागू करणेस सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे सादर केला आहे.

मा.श्री.शाम नळकांडे :- मागच्या सभेमध्ये अग्निशमन विभागा करीता मानधनावर कर्मचारी घेणे बाबतचा विषयावर चर्चा झाली होती त्याचे काय झाले.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- निविदा प्रसिध्द करण्यात आली आहे.निविदा उघडल्यानंतर कोणाची निविदा आलेली आहे हे समजेल त्यानुसार पुढील कार्यवाही केली जाईल.

मा.श्री.शाम नळकांडे :- आउटसोर्सीग मार्फत निविदेला प्रतिसाद मिळाला नाही तर मानधनावर कर्मचारी घेण्यात बाबत कार्यवाही करावी.हा खुप महत्वाचा विषय आहे.

मा.श्री.समद खान :- अग्निशमन कर लावणे बाबतचा प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करण्यात यावा.

मा.श्री.शाम नळकांडे :- महासभेपुढे विषय सादर करण्यात यावा.मा.महासभा याबाबत निर्णय घेईल.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून प्रत्येक करयोग्य मुल्याचे २% अग्निशमन करणे बाबतचा प्रस्ताव मा.महानगरपालिका सभे पुढे सादर करण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट नुसारअहमदनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये सन २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून प्रत्येक करयोग्य मुल्याचे २% अग्निशमन करणे बाबतचा प्रस्ताव मा.महानगरपालिका सभे पुढे सादर करण्यात यावा.

सदरचा ठराव विभागाने प्रशासकीय मान्यता घेवून मा.महानगरपालिका सभे पुढे सादर करण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्र.- ११**

विषय क्रमांक- १९३ गुरूवार दि.२७/०१/२०२२

**प्रस्तावाचा विषय :-** नालेगांव गाडगीळ पटांगण येथील जनकल्याण रक्तपेढी या कंम्पौड मधील पुर्व दक्षिण कोप-यातील ८x१० चौ.फु.मोकळी जागा भाडे तत्वावर देणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका मार्केट विभाग

**संदर्भ :-** १.श्री.सचिन बाळासाहेब गोलांडे यांचा दि.२०/१२/२०१९ रोजीचा अर्ज.

२. मा.सहा.जिल्हानिबंधक (वर्ग - १) तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे जा.क्र.२०७८ दि.१५/०२/२०२० चे पत्र.

३.नगररचना विभाग जा.क्र.२०५ दि.१०/०१/२०२०

उपरोक्त संदर्भय विषयांन्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की,अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या आरक्षण क्र.१३४ नालेगांव (झोन क्र.१/१०९ सि.स.नं.६०१५ अ /२ अ) जनकल्याण रक्तपेढी या कंपाउंड मधील पुर्व दक्षिण कोप-यांत ८x१० चौ.फु.मोकळी जागा भाडे तत्वावर मिळणे बाबत श्री.सचिन बाळासाहेब गोलांडे यांचा दि.२०/१२/२०१९ रोजीचा अर्ज इकडेस प्राप्त झाला आहे.मा.सहा.जिल्हानिबंधक (वर्ग -१) तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी संदर्भ क्र.२ अन्वये उक्त मिळकतीचे मुल्यांकन रू.४९२१६/- इतके निश्चित केले आहे.त्यानुसार रू.४९२१६ x ८ %= रू.४९३७/- इतके वार्षिक भाडे होत आहे.

अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या आरक्षण क्र.१३४ नालेगांव ा (झोन क्र.१/१०९ सि.स.नं.६०१५ अ /२ अ) नालेगांव गाडगीळ पटांगण येथील जनकल्याण रक्तपेढी या कंपाउंड मधील पुर्व दक्षिण कोप-यातील ८x१० चौ.फु. मोकळी जागेचे वार्षिक भाडे रू.४९३७/- भागीले १२= रू.४१२ व अनामत रक्कम रू.४९३७/- घेवून १० वर्ष कराराने वरील मोकळी जागा भाडेतत्वावर देणेकामी निर्णय घेणे उचित वाटते सदरील जाहिर लिलावाची बातमी जिल्हास्तरीय वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेस व त्याकाती येणा-या खर्चास व कामास मंजूरी मिळणेबाबत वरीष्ठस्तरावर रिपोर्ट आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) याचा अभिप्राय की,प्रस्तावित " अ " प्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,नगररचना सविस्तर अभिप्राय सादर करणे.

यावर सहाय्यक संचालक नगररचना यांचा अभिप्राय की,उपरोक्त जागेचे बाजार भावानुसार साधारणपणे मुल्यांकन खालील प्रमाणे ,जागेचे क्षेत्र ७.४३ चौ.मी.,सदर जागेचा सन २०२१-२२ वा.मु.दर तक्यातील दर रू.८२८०/-प्रति चौ.मी.१. जागेचे मुल्य = ७.४३ x ८२८० = ६१,६२०/-बाजाराभावानुसार साधारणपणे जागेच्या मुल्यांच्या १२% इतके वार्षिक परतावा मनपास मिळणे आवश्यक आहे.२. वार्षिक भाडे =६१५२०x१२= ७३८२%/-३.दरमहा भाडे =७३८२/१२=६१५ समजा रू.६५०/- इतके दरमहा भाडे आकारणे योग्य होईलअसे मत आहे. ४. तसेच जागेचा मुल्यांच्या ५०% म्हणजेच रू.३०,७६०/- इतकी अनामत रक्क्म घेणे योग्य होईल.

या प्रमाणे पुढील नियमानसुार कार्यवाही करणेस हरकत नाही. असे मत आहे.

यावर मा.सहाय्यक आयुक्त याचा अभिप्राय की,प्रस्तावित केल्याप्रमाणे आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,मान्यतेसाठी सादर.

यावर आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,स.सं.न.र. सविस्तर अहवाल म्हणजे,१. नगररचनेच्या दृष्टीने योग्य/अयोग्य २. वाहतुकीसाठी अडचणी बाबत.३.विकाय योजना सुसंगत अगर कसे.४. सदर जागेत आरक्षण

आहे किंवा कसे.५.भविष्यात महानगरपालिकेस जागेचा वापर करावयाचा झालेस काय? फक्त जागेबाबत उत्पन्न नसुन नियोजनाच्या दृष्टीने अभिप्राय तांत्रिक दृष्या सादर करणे.

यावर सहाय्यक संचालक ,नगररचना यांचा अभिप्राय की,फेरसादर,या कार्यालयाने यापुर्वी जा.क्र.टि.पी.दि.१०/०१/२०२० अन्वये अभिप्राय दिलेला असून वरील मुद्यांच्या अनुषंगाने फेर अभिप्राय सादर करीत आहे.

अर्जदार यांनी मागणी केलेली जागा ही शहराच्या मंजूर विकास योजनेत सार्वजनिक,निमसार्वजनिक विभागात दर्शविलेली असून त्यात आरक्षण क्र.१३४ म्यु.पल.कार्यालय म्हणून आरक्षीत आहे.सद्यस्थितीत सदर जागेतील विद्यमान इमारत जन कल्याण रक्तपेढी व नालेगांव तलाठी कार्यालये आहे.
अर्जदार यांनी सदरच्या पुर्व - दक्षिण कोप-यामध्ये रिकामी असलेली जागा गोर गरीब विद्यार्थ्यासाठी शैक्षणिक मार्गदर्शन केंद्रासाठी मागणी केलेली असल्याने या कार्यालयाने पत्र क्र.२०५ दि.१०/०१/२०२० मधील नमुद अटीवर तात्पुरत्या स्वरूपात जागा वापरास देणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल की,उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येते की,अहमदनगर महानगरपालिका मालकीच्या अहमदनगर नालेगांव गाडगीळ पटांगण येथील जनकल्याण रक्तपेढी या कंम्पौंड मधील पुर्व दक्षिण कोप-यातील ८x १० = ७.४३ चौ.मी.क्षेत्राची खुली जागा भाडेतत्वावर लिलाव पध्दतीने देणे कामी मा.आयुक्त साहेब यांनी दि.२४/०८/२०२१ रोजी मान्यता दिली आहे.

तरी जाहिर लिलावाची तारीख व वेळ निश्चित करून मिळणेस रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की,स्थायी समिती पुढे प्र.मा.साठी सादर करा.

यावर मार्केट विभाग प्रमुख यांचा अहवाल की,उपरोक्त विषयांन्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की,विषयांकीत जागा जाहिर लिलाव पध्दतीने देणेबाबत मा.आयुक्त साहेब यांनी दि.२४/०८/२०२१ रोजी मान्यता दिली असून मा.उपायुक्त (कर) यांनी आदेशीत केल्यानुसार खालीलप्रमाणे रिपोर्ट सादर करण्यात येत आहे.

अहमदनगर महानगरपलिकेंच्या मालकीचे नालेगांव गाडगीळ पटांगण येथील जनकल्याण रक्तपेढी या कंम्पौंड मधील पुर्व दक्षिण कोप-यातील ८x १०= ७.४३ चौ.मी.क्षेत्राची जागेचे मा.सहाय्यक संचालक नगररचना मनपा यांनी जा.क्र./न.र./१५४१ दि.०९/०७/२०२१ अन्वये दरमहा भाडे रू.६५०/- व अनामत रक्कम रू.३०,७६०/- इतकी निश्चित केलेली आहे.

तरी स्पर्धात्मक दृष्टया लाभ मिळणेकामी सदर जागेची जाहिर लिलावाची नोटीस वर्तमान पत्रात प्रसिध्द करणेबाबत तसेच उपरोक्त खुली जागा नेहमीच्या अटी व शर्तीनुसार कराराने भाडेतत्वावर देणेकामी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी निर्णयास्तव मा.स्थायी समितीपुढे सादर करणेस रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त(कर) यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>ऑनलाईन चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- नालेगांव गाडगीळ पटांगण येथील जनकल्याण रक्तपेढी या कंम्पौड मधील पुर्व दक्षिण कोप-यातील ८x१० चौ.फु.मोकळी जागा भाडे तत्वावर देणे बाबत ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.समद खान :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा

.

मा.श्री.शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपलिकेंच्या मालकीचे नालेगांव गाडगीळ पटांगण येथील जनकल्याण रक्तपेढी या कंम्पौंड मधील पुर्व दक्षिण कोप-यातील ८x १०= ७.४३ चौ.मी.क्षेत्राची जागेचे मा.सहाय्यक संचालक नगररचना मनपा यांनी जा.क्र./न.र./१५४१ दि.०९/०७/२०२१ अन्वये दरमहा भाडे रू.६५०/- व अनामत रक्कम रू.३०,७६०/- इतकी निश्चित केलेली आहे.स्पर्धात्मक दृष्टया लाभ मिळणेकामी सदर जागेची जाहिर लिलावाची नोटीस वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यास व अटी व शर्तीनुसार कराराने भाडेतत्वावर देणेकामी सदरचा प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्ट नुसार अहमदनगर महानगरपलिकेंच्या मालकीचे नालेगांव गाडगीळ पटांगण येथील जनकल्याण रक्तपेढी या कंम्पौंड मधील पुर्व दक्षिण कोप-यातील ८x १०= ७.४३ चौ.मी.क्षेत्राची जागेचे मा.सहाय्यक संचालक नगररचना मनपा यांनी जा.क्र./न.र./१५४१ दि.०९/०७/२०२१ अन्वये दरमहा भाडे रू.६५०/- व अनामत रक्कम रू.३०,७६०/- इतकी निश्चित केलेली आहे.

स्पर्धात्मक दृष्टया लाभ मिळणेकामी सदर जागेची जाहिर लिलावाची नोटीस वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यास व अटी व शर्तीनुसार कराराने भाडेतत्वावर देणेकामी सदरचा प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.समद खान सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

सभापती

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका